

# कमला कॉलेजमध्ये स्वावलंबनाचे धडे

दै. लोकमत
6 ऑक्टोबर 2018

कोल्हापुरातील टाकाळा चौक परिसरातील कमला महाविद्यालय म्हणजे शिक्षणाबरोबरच विद्यार्थिनींच्या कला-गुणांना वाव देणारे आणि त्यांना स्वयंरोजगाराचे धडे देणारे महाविद्यालय. येथील विद्यार्थिनी वर्षभर विविध उपक्रमांच्या माध्यमातून क्रियाशील असतात.

**इंदूमती गणेश**

पारंपरिक सणांचे औचित्य साधून महाविद्यालयात वेगवेगळ्या वस्तूंची निर्मिती केली जाते. गणपतीच्या सजावटीचे साहित्य, आकाशकंदील, पोषणयुक्त आइस्क्रीम, चॉकलेटच्या राख्या, बुके, केक, बिस्किटे, इमिटेशन ज्वेलरी अशा वस्तूंच्या विक्रीसाठी स्टॉल लावून त्यांची बाजारभावापेक्षा स्वस्त दराने विक्री केली जाते.

ब्युटी कल्चर अ‍ॅन्ड ब्युटी थेरपी कोर्समधून मुली स्वत:चा व्यवसाय करून हजारो रुपयांचे उत्पन्न घेत आहेत. योगा डिप्लोमा, एम. ए. इन योगा हे कोर्सेसही येथे शिकविले जातात. फूड प्रोसेसिंग विभागातर्फे खाद्य पदार्थांचे प्रशिक्षण दिले जाते. वेगवेगळ्या कंपन्यांना कन्सल्टन्सी पुरविली जाते. संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, डॉ. जे. बी. पाटील, सचिव प्राजक्ता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वरील उपक्रम राबविले जातात.